**“सप्टेंबर २०१७” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या <u>महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...</u>**

## (क) <u>शासन निर्णय / अधिसूचना</u>

- “Recommendations of the Seventh Central Pay Commission – Implementation of decision relating to the grant of Children Education Allowance.” या विषयाबाबतचे केंद्र शासनाच्या कार्मिक व लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाचे क्रमांक-A-२७०१२/०२/२०१७-Esst-(AL), दिनांक १६ ऑगस्ट २०१७ चे पत्र या विभागाच्या दिनांक ६ सप्टेंबर २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र संवर्गातील सर्व भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात आले आहे.

- महापार ही प्रणाली दिनांक ३ जुलै २०१७ पासून प्रत्यक्ष कामकाजासाठी उपलब्ध करुन देणे आणि कार्यमुल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्धतीने नोंदविणे यासाठी सुधारित वेळापत्रक दिनांक १६ सप्टेंबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आले आहे.

- दिनांक १९ सप्टेंबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये अस्थायी शासकीय अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना स्थायित्व प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत विभागांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांतील काही मुद्दयांबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

- दिनांक २० सप्टेंबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सेवानिवृत्ती / स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर अखिल भारतीय सेवेतील / राज्य शासकीय अधिकाऱ्यांच्या करताना शासन स्तरावर प्रशासकीयदृष्टया समन्वय राखण्याच्या दृष्टीने काही निदेश दिले आहेत.

- दिनांक २५ सप्टेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी संवर्गाची सन २०१६ व २०१७ या वर्षातील पदसंख्या निश्चित करण्यात आली आहेत.

- दिनांक २५ सप्टेंबर २०१७ च्या शासन शुद्धीपत्रान्वये श्री.राधेश्याम मोपलवार, भाप्रसे यांच्याविरुद्ध प्राप्त तक्रारींबाबत नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीमधील सदस्य क्रमांक-२ मधील श्री.प्रविण पडवळ, अतिरिक्त पोलीस आयुक्त, मुंबई ऐवजी श्री.रावसाहेब दत्तात्रय शिंदे, अतिरिक्त पोलीस आयुक्त, संरक्षण व सुरक्षा यांचे कार्यालय, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

- दिनांक २६ सप्टेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये सीपीटीपी-४ अंतर्गत राज्यसेवा (मुख्य) परीक्षा २०१५ व २०१६ व्दारे महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत केलेल्या ३२ कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गातील परिविक्षाधीन उमेदवारांच्या दिनांक २९ जुलै २०१७ ते ३१ जुलै २०१९ या परिविक्षा कालावधीतील वेतनासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

- दिनांक २९ सप्टेंबर २०१७ च्या शासन शुद्धीपत्रान्वये मे.झमझम एन्टरप्रायजेस, फोर्ट, मुंबई यांच्याकडून सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठी दिनांक १ जुलै २०१७ ते ३० जून २०१८ या कालावधीसाठी लागणारे साहित्य पुरविण्यासाठी जीएसटी कर प्रणालीनुसार दरांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

- दिनांक २१ सप्टेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा तत्त्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय / परिपत्रकांचे एकत्रिकरण करुन सर्वसमावेशक आदेश देण्यात आले आहे.

- दिनांक १३ सप्टेंबर २०१७ च्या च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा २०१७ ला पुन्हा (Repeater) बसू इच्छित असलेल्या उमेदवारांचे अर्ज दिनांक २९ सप्टेंबर २०१७ पर्यंत पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

- दिनांक १९ व २६ सप्टेंबर २०१७ च्या शासन शुद्धीपत्रान्वये सीपीटीपी-४ अंतर्गत काही सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**(ख) <u>प्रशिक्षण</u>**

- दिनांक २० सप्टेंबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभाग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय यामधील सहायक कक्ष अधिका-यांसाठीची सन २०१७ मधील सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा पुढे ढकलण्यात येऊन, ती दिनांक २५ व २६ सप्टेंबर २०१७ रोजी विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई येथे आयोजित करण्यात केले आहे.

**(ग) <u>सरळसेवा नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>**

- २ सहायक कक्ष अधिकाऱ्यांना कक्ष अधिकारी पदी पदोन्नती देण्यात आली आहे.
- १ सहसचिव, ९७ कक्ष अधिकारी अशा ९८ अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे नियमित दिनांक देण्यात आले आहेत.

**(घ) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील १६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- ४ उपसचिव, ३ अवर सचिव, २ कक्ष अधिकारी, १ सहायक कक्ष अधिकारी व १ निम्नश्रेणी लघुलेखक अशा ११ अधिकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

**(ङ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- १ सहसचिवाला प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात आली आहे.
- १ कक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

***********